# हिमगिरीयन्स...



# अनुक्रमणिका

१. प्रस्तावना

२. आठवण – मनोगत

३. आयुष्याला द्यावे उत्तर...

४. अब्राहम लिंकनचे हेडमास्तरांस पत्र

५. एकाच ह्या जन्मी जणू, फिरुनी नवी जन्मेन मी...

६. स्नेह-संमेलनाची तयारी (छायाचित्रे)

७. शाळेची आठवण (छायाचित्रे)

८. कोलंबसाचे गर्वगीत








# आपण सारे हिमगिरीयन्स !

ऐंशीच्या दशकातील पुणे नगर महामार्गाच्या अलिकडील मागास भाग म्हणजे सध्याचा विश्रांतवाडी, टिंगरेनगर, विद्यानगर, धानोरी, कलवड, बर्माशेल, संजयपार्क, लोहंगाव, नागपूरचाळ व येरवडा परिसर हा भाग आत्ता अतिशय विकसित दिसतो. मोठेमोठे मॉल, रहिवाशी इमारती, आय.टी कंपन्या, शोरूम, लोहंगाव विमानतळ, मोठी बाजारपेठ आणि राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांचे मोठे जाळे या भागात पहायला मिळते. मात्र आज कोणी आपल्याला सांगितले की ऐंशीच्या दशकात पुणे शहाराच्या या भागात सी.बी.एस.ई, आय. सी. एस. ई.सोडा पण मराठी माध्यामाची माध्यामीक शाळा ही असित्वात नव्हती, तर यावर कुणाचाही विश्वास बसणार नाही.

त्यावेळी विश्रांतवाडी भागात दगड खाण व खडीमशीन होती. याठिकाणी काम करणाऱ्या कामगारांचे मोठया कंपन्यांमध्ये कामासाठी आलेल्या सर्वसामान्य चाकरमाने/ नोकरदार विद्यानगर, टिंगरेनगर, धानोरी, नागपूरचाळ भागात रहायला येऊ लागले होते. येरवडयात फक्त सातवीपर्यंत शाळा होती. त्यामुळे मोलमजूरी करणाऱ्या आणि सर्वसामान्य नोकदारांच्या मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध नव्हती. अशा मागास भागात कोणी शिक्षण संस्था काढणार तरी कशाला? मात्र ज्ञानोबा, तुकोबा आणि शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन आलेल्या या पंचक्रोशीचे रुपडे पालटविण्याची विधात्याचीच इच्छा असावी.

उत्तराखंडातील हृषिकेश येथील एका ट्रस्टवर कार्य करणाऱ्या वारकरी सांप्रदायातील एका व्यक्तीच्या मनात ट्रस्टच्या माध्यामातून वृद्धाश्रम, अनाथालय, सत्संगभवन सुरु करण्याऐवजी शाळा सुरु करावी. असे विचार आले. कारण 'ज्ञानदान' हेच खरे संताचे महत्त्वाचे कार्य आहे, अशी त्यांची धारणा होती.



त्यांच्या या ‘एका’ विचारामुळे टिंगरेनगर, धानोरी, विश्रांतवाडी परिसराचे चित्र बदलणारे होते याबद्दल मात्र कुणालाही कल्पना नसावी. ‘श्री विठ्ठलाश्रम हृषिकेश ट्रस्टचा शाळा सुरु करणास हिरवा कंदील होता. त्यावेळी कोथरुडसारख्या भागात शाळा सुरू करण्याऐवजी त्यांनी टिंगरेनगरसारख्या मागास भागात शाळा सुरु करण्याचे ठरविले, मात्र खरी कसोटी तर पुढे होती. कारण तो कालखंड होता 1978 चा. त्यावेळी नवीन मराठी माध्यमाच्या शाळांना परवानगी न देण्याचे महाराष्ट्र सरकारचे धोरण होते. तरीही ‘विशेष बाब’ म्हणून राज्य सरकाराने शाळेस परवानगी दिली. असे म्हणतात, माणसाने निर्माण केलेली प्रत्येक कलाकृती किंवा रचना दोनदा तयार होत असते. दुसऱ्यांदा तयार होते ती आपण सगळेजण आपल्या डोळयांनी पाहू शकतो मात्र पहील्यांदा ती कलाकृती कुठे तयार होत असेल तर ती आपल्या डोक्यात. टिंगरेनगर परिसरातील पहिली मराठी माध्यामाची शाळाही पहिल्यांदा ज्या व्यक्तीच्या सुपिक डोक्यात सुरु झाली ती व्यक्ती म्हणजे आपले हिमगिरी विद्यालयचे संस्थापक श्री सोपान भुकेले सर.

नवीन मराठी शाळांना मान्यता न देण्याचे सरकारचे धोरण असतानाही ट्रस्टचे संचालक श्री तेंडूलकर यांच्या माध्यमातून संबंधीत खात्याच्या सचिवांना शाळेस परवानगी मिळाल्यास टिंगरेनगर, विश्रांतवाडी भागातील मुला-मुलींना शिक्षणाची दारे खुली होतील हि बाब पटवून देण्यात आली आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीत ‘विशेष बाब’ म्हणून शाळा सुरु करण्यास परवानी देण्यात आली.

मे महिन्यात शाळा सुरु करण्यास परवानगी मिळाली. 15 जूनला शाळा सुरु करायची होती, पण ना कुठे शाळेची इमारत होती ना विद्यार्थ्यांचा पत्ता होता. त्याचवेळी श्री सोपान भुकेले सरांनी महापालिका शाळेतील शिक्षक श्री सोपान शिंदे व श्री लोंढे यांच्याबरोबर चालत, प्रसंगी सायकलवरून, परिसरातील घरोघरी जाऊन विद्यार्थी शोध मोहीम सुरु केली.

टिंगरेनगर येथील बाळासाहेब टिंगरे यांनी त्यांची चाळ आणि मोकळी जागा भाडयाने देऊ केली होती. सध्याच्या रोड क्रमांक चौदा येथे ही जागा होती. 12 जून 1978 रोजी श्री बाळासाहेब टिंगरे, श्री कुंजीर, सौ. शांताबाई चौधरी, श्री भुकेले सर, श्री शिंदे सर, श्री जाधव सर, श्री सोपान शिंदे आणि श्री लोंढे





गुरुजी यांनी भटकंती करुन मिळविलले नऊ विद्यार्थी यांच्या उपस्थितीत शाळेचे उद्घाटन झाले. हीच ती आपली 'जुनी  हिमगिरी'.

शाळेच्या मान्यतेची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी नऊ विद्यार्थ्यांनी भागणार नव्हते. त्यासाठी शाळेची पटसंख्या 60 असणे गरजेचे होते. वरील मंडळींच्या अथक प्रयत्नातून सप्टेंबर 1978 मध्ये हा अडथळाही दूर करण्यात आला आणि म्हणूनच आपल्यासारखे हजारो विद्यार्थी घडू शकले. 1981 साली शाळा अनुदानित झाली. कालांतराने शाळेची स्वत:ची इमारत उभी राहिली. हीच ती सध्याची 'हिमगिरी विद्यालय' ची इमारत. जिथे आपल्यापैकी बहुतेक विद्याथर्यांनी शिक्षण घेतले आहे आणि काहीजणांना इमारतीचे बांधकाम चालू असताना 'श्रमदान' करण्याची संधीही मिळाली होती.

एखादया वटवृक्षीचे रोपटे उगवते त्यावेळी भविष्यातील त्याच्या भव्यतेचा कुणालाही अंदाज नसतो. त्याचप्रमाणे 'हिमगिरी' विद्यालयाचा वटवृक्ष बहरला होता. नऊ विद्याथर्यांच्या साक्षीने 1978 झाली सुरु झालेल्या आपल्या शाळेची पटसंख्या 1995 च्या दरम्यान दोन हजारांवर गेली होती. कधीकाळी दरोदार फिरून शाळेच्या मान्यातेसाठी 60 विद्यार्थी मिळविले होते. आणि आता एका एक वर्गात सत्तर- सत्तर विद्यार्थी होते. चार ज्यादा तुकडयांना मान्यता मिळूनही वर्गात जागाच शिल्लक नसल्याने नवीन विद्याथर्यांना प्रवेश देता येत नव्हता . या वृटवृक्षाच्या कुशीत समाजाच्या विविध स्तरातील विद्यार्थीरूपी अनेक पक्षी आले आणि ज्ञानानेच नव्हे तर संस्करांनीही समृद्ध झाले.

याच शाळेत आम्हाला 'आईच्या' मायेने आणि बापाच्या कडक शिस्तीने शिकविणारे अनेक शिक्षक भेटले. ज्या विद्याथर्यांनी तळहातावर पडणाऱ्या छड्याही प्रसादाप्रमाणे झेलल्या त्यांच्या जीवनात इथे मिळालेल्या ज्ञानाने आणि संस्कारांनी त्यांना एका भक्कम पायावर उभे केले. याच शाळेने अनेक अभियंते, डॉक्टर, व्यावसायिक, शिक्षक, राजकीय, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, बहुराष्ट्रीय कंपन्यात चांगल्या पदांवर काम करणारे नोकरदार घडविले. छोट्या पातळीवर काम करणारेही अनेकजण आहेत मात्र त्यांच्यात दिसणारी सचोटी, प्रामाणिकता ही फक्त 'हिमगिरी मुळेच आहे. आपल्या शाळेत वारकरी सांप्रदायाच्या विचारांमुळे संस्करांना अतिशय महत्त्व आहे. शिक्षणाबरोबर संस्कारही देणारी, अवघ्या पंचक्रोशीतील 'हिमगिरी' हि एकमेव शाळा आजमितीस अस्तित्वात आहे.



शाळेने रुजवलेल्या असंख्य संस्कारांचा एक भाग म्हणून शाळेशी असलेले ऋणानुबंध अधिक दृढ करण्यासाठी शाळेच्या सर्व बॅचेसच्या अनेक माजी विद्यार्थयांनी स्नेहसंमेलन आयोजित केले आहे. शाळेचा अभ्यासक्रम पूर्ण करून दूर गेलेले अनेक विद्यार्थी, निवृत्त शिक्षक, परदेशस्थ माजी विद्यार्थी, लग्न होऊन सासरी गेलेल्या अनेक भगिनी, आपल्या मुलांवर संस्कार होताना पाहणारे अनेक पालक तसेच शाळेशी या ना त्या कारणाने नाळ जोडली गेलेली अनेक माणसे अशा असंख्य लोकांना शाळेशी असलेले ऋणानुबंध जोपासता यावेत यासाठी माजी विद्यार्थांनी शाळा डिजिटल स्वरूपात उतरवण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी हिमगिरी विद्यालयाची वेबसाईट तयार करण्यात आली आहे. या वेबसाईट मध्ये शाळेशी निगडित अनेक आठवणी फोटोज आणि व्हिडीओज च्या स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. या सर्व प्रपंचात शाळेच्या अनेक माजी विद्यार्थ्यांनी, शाळेच्या शिक्षकांनी आणि शाळा प्रशासनाने मोलाचे सहकार्य केले आहे. सर्वात महत्वाची बाब म्हणजे या सर्व कार्यभागास शाळेचे संस्थापक आदरणीय श्री सोपान भुकेले सरांनी परवानगी दिली आहे.


या सर्व प्रपंचाचा उद्देश एवढाच कि शाळेशी असलेले सर्वांचे ऋणानुबंध असेच अबाधित राहावेत. पुन्हा एकदा आम्ही हिमगिरी विद्यालय, शाळा प्रशासन, सर्व शिक्षक, आजी-माजी विद्यार्थी आणि शाळेचे संस्थापक आदरणीय श्री सोपान भुकेले सर या सर्वांना कोटी-कोटी प्रणाम करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देतो. धन्यवाद !!!

जयहिंद

जय महाराष्ट्र!

आपण सारे हिमगिरीयन्स!





# *आठवण *

काही घटना...आठवणी अशा असतात की काळजात रुतून बसतात. जखम होते पण ही जखमही हवी-हवीशी वाटते.थोडा धक्का लागला....की जखम भळभळायला लागते...रक्त वहायल लागत....डोळयांमध्ये अश्रु जमायला लागतात आणि त्याचवेळी ओठांवर मात्र हसू उमटतं.....जणू काही पहीले प्रेमच ते!

खरचं की पहील प्रेमच होत ते माझ्या आयुष्यातंल...शाळेचं माझ्यावर अन माझं शाळेवर.

कृतज्ञता सोहळा ठरला आणि एक-एक आठवण ताजी व्हायला लागली. जणूकाही काल परवाच तर घडलयं सगळं. शाळेचं प्रवेशद्वार....शाळेचं मैदान....शाळेच्या भिंती....शाळेच्या वर्गातील बाकडी....माऊलीचे मंदीर...सगळे काही एकाचवेळी बोलायला लागले माझ्याशी... पार गोंधळ उडाला माझा तर!
मनात विचार आला पुन्हा त्या 'नववी' च्या वर्गात माझ्या बाकावर बसायला मिळालं तर? आणि मनातल्या मनात बसलोही जाऊन 'त्या' बाकावर....आणि घालमेल वाढायला लागली डोळयातून दोन...चार अश्रुंचे थेंब पाझरायला लागले. नको....नको... नाही सहन व्हायचं ते! तेव्हा शाळा बुडवायला मजा यायची आणि आता शाळेच्या आठवणीने जीव कासावीस होतोय माझा.

सगळे शिक्षक भेटणार आहेत 20 जानेवारी 2019 ला 'कृतज्ञता साहेळयात'. तसा निगरगट्ट आहे. मी रडायचो नाही. भावनिक होऊन पण सुटलाच जरी अश्रुंचा बांध आवरणारही नाही मी, कदाचित हलकं-फुलकं वाटेल. मला जूने वर्गमित्र...

वर्गातल्या मुली दिसतील, भेटतील...काही बोलतीलही. जून्या आठवणींमध्ये रममाण घेऊन जातील.

मानाप्रमानाचे प्रसंगआठवतील...गृहपाठ..दफ्तर...प्रयोगशाळा...क्राफ्टची, चित्रकलेची वही...एकत्र खालेल्या डबा...चाचण्या...तोंडी परिक्षा...सहामाही वार्षिक परिक्षा...पास...नापास...हातावरच्या छडया....पाठीत बसलेला धम्मक लाडू....पीटीचा तास...कवायत...सगळंकाही पुन्हा अनुभवयाला मिळेल.आता लिहीतानाच कसं हवंहवस वाटतय. तेव्हा मात्र जणूकाही ‘शिक्षा’ दिल्यासारख वाटायच हे सर्व.

काळ सरत गेला...वय वाढत गेल खेळायचे, बागडायचे दिवस संपले अन जबाबदाऱ्यांच ओझं अंगावर पडल. म्हणतात ना ‘गेल ते दिवस, राहिल्या त्या आठवणी.

‘कृतज्ञता’ सोहळ्याच्या आठवणीही रूतून बसतील पुन्हा काळजात. जखम होईल.. धक्का लागेल, जखमेतून भळभळा रक्त वाहील...डोळयातून अश्रु जमा होतील..आणि त्याचवेळी ओठांवर मात्र हसू उमटेल...नकळत जणू पहीलं प्रेमच ते... शाळेचं माझ्यावर अन माझं शाळेवर!

- संतोष निंबाळकर (1996-1997)
  (9764480039)



# आयुष्याला द्यावे उत्तर...

असे जगावे दुनियेमध्ये,
आव्हानाचे लावुन अत्तर,
नजर रोखुनी नजरे मध्ये,
आयुष्याला द्यावे उत्तर..

नको गुलामी नक्षत्रांची,
भीती आंधळी ताऱ्यांची,
आयुष्याला भिडतानाही,
चैन करावी स्वप्नांची..

असे दांडगी इच्छा ज्याची,
मार्ग तयाला मिळती सत्तर,
नजर रोखुनी नजरे मध्ये,
आयुष्याला द्यावे उत्तर..

पाय असावे जमिनीवरती,
कवेत अंबर घेताना,
हसू असावे ओठांवरती,
काळीज काढुन देताना..

संकटासही ठणकावुन सांगावे,
आता ये बेहत्तर,
नजर रोखुनी नजरे मध्ये,
आयुष्याला द्यावे उत्तर..

करुन जावे असेही काही,
दुनियेतुनी या जाताना,
गहिवर यावा जगास सा-या,
निरोप शेवटचा देताना..

स्वर कठोर त्या काळाचाही,
क्षणभर व्हावा कातर कातर,
नजर रोखुनी नजरे मध्ये,
आयुष्याला द्यावे उत्तर...

- **विंदा करंदीकर**

( Source – Internet)




# अब्राहम लिंकनचे हेडमास्तरांस पत्र

प्रिय गुरुजी,

सगळीच माणसे न्यायप्रिय नसतात,
नसतात सगळीच सत्यनिष्ठ,
हे शिकेलच माझा मुलगा कधी ना कधी.
मात्र त्याला हे देखील शिकवा,
जगात प्रत्येक बदमाशागणिक
असतो एक साधूचरित , पुरुषोत्तमही
स्वार्थी राजकारणी असतात जगात,
तसे असतात अवघं आयुष्य समर्पित करणारे नेतेही.
असतात टपलेले वैरी , तसे जपणारे मित्रही,
मला माहित आहे !
सगळ्या गोष्टी झटपट नाही शिकवता येत.........
तरीही जमलं तर त्यांच्या मनावर ठसवा,
घाम गाळून कमावलेला एकच छदाम,
आयत्या मिळालेल्या घबाडापेक्षा मौल्यवान आहे.
हार कशी स्वीकारावी ते त्याला शिकवा
आणि शिकवा विजयाचा आनंद संयमाने घ्यायला ,
तुमच्यात शक्ती असती तर .........
त्याला द्वेष मत्सरापासून दूर रहायला शिकवा
आणि शिकवा त्याला आपला हर्ष संयमाने व्यक्त करायला.
गुंडांना भीत जावू नको म्हणावं,
त्यांना नमविणे सर्वात सोपं असतं.
जमेल तेवढं दाखवित चला त्याला ,



ग्रंथ भांडाराच अदभूत वैभव.
मात्र त्याबरोबरच ,
मिळू दे त्याच्या मनाला निवांतपणा,
सृष्टीचं शाश्वत सौंदर्य अनुभवायला ,
पाहू दे त्याला , पक्षांची अस्मान भरारी ...........
सोनेरी उन्हात भिरभिरणारे भ्रमर .........
आणि हिरव्यागार डोंगर उतारावर डुलणारी चिमुकली फुलं......
शाळेत त्याला हा धडा मिळू दे ,
फसवून मिळालेल्या यशापेक्षा ,
सरळ आलेल अपयश श्रेयस्कर आहे .
आपल्या कल्पना, आपले विचार ,
यांच्यावर दृढ विश्वास ठेवायला हवा त्याने ,
बेहत्तर आहे सर्वांनी त्याला चूक ठरवलं तरी ,
त्याला सांगा ...............
भल्याशी भलायीन वागावं,
आणि टग्यांना अद्दल घडवावी .
माझ्या मुलाला हे पटवता आल तर पहा .........
जिकडे सरशी तिकडे धावत सुटणाऱ्या भाऊगर्दीत,
सामील न होण्याची ताकद त्यान कमवायला हवी ,
पुढे हेही सांगा त्याला ,
ऐकावं जनाच अगदी सर्वांच ..........
पण गाळून घ्यावं ते सत्याच्या चाळणीतून ,
आणि फोलपट टाकून निव्वळ सत्व तेवढं स्वीकाराव.
जमलं तर त्याच्या मनावर बिंबवा,
हसत रहावं उरातल दुख्ख दाबून ,
आणि म्हणावं त्याला
आसवांची लाज वाटू देऊ नको.
त्याला शिकवा .........






तुच्छतावाद्याना तुच्छ मानायला ,
अन चाटुगिरीपासून सावध रहायला .
त्याला हे पुरेपूर समजवा की ,
करावी कमाल कमाई त्याने, ताकद आणि अक्कल विकून,
पण कधीही विक्रय करू नये, हृदयाचा आणि आत्म्याचा.
धिक्कार करणाऱ्यांच्या झुंडी आल्या तर,
कानाडोळा करायला शिकवा त्याला.
आणि ठसवा त्याच्या मनावर,
जे सत्य आणि न्याय वाटते,
त्याच्यासाठी पाय रोवून लढत रहा.
त्याला ममतेन वागवा,
पण, लाडावून ठेवू नका.
आगीत तावून सुलाखून निघाल्याशिवाय
लोखंडाच कणखर पोलाद होत नसतं,
त्याच्या अंगी बाणवा अधीर व्हायचं धैर्य,
अन धरला पाहिजे धीर त्याने,
जर गाजवायच असेल शौर्य .
आणखीही एक सांगत रहा त्याला ..........
आपला दृढ विश्वास पाहिजे आपल्यावर,
तरच जडेल उदात्त श्रद्धा मानवजातीवर,
माफ करा गुरुजी,
मी फार बोललो आहे _
खूप काही मागतो आहे.........
पण पहा........
जमेल तेवढ अवश्य कराच,
माझा मुलगा, भलताच गोड छोकरा आहे हो तो.

\- अब्राहम लिंकन

(Source - Internet)






# एकाच ह्या जन्मी जणू, फिरुनी नवी जन्मेन मी

एकाच ह्या जन्मी जणू
फिरुनी नवी जन्मेन मी

स्वप्नाप्रमाणे भासेल सारे
जातील साऱ्या लयाला व्यथा
भवती सुखाचे स्वर्गीय वारे
नाही उदासी ना आर्तता
ना बंधने वा नाही गुलामी
भीती अनामी विसरेन मी
हरवेन मी, हरपेन मी
तरीही मला लाभेन मी


आशा उद्याच्या डोळ्यात माझ्या
फुलतील कोमेजल्यावाचुनी
माझ्या मनीचे गूज घ्या जाणुनी
या वाहणाऱ्या गाण्यातुनी
लहरेन मी, बहरेन मी,
शिशिरांतुनी उगवेन मी

(source - Internet)


हिमगिरी विद्यालय पुणे

स्नेह-संम्मेलन आयोजन करतानाचे काही फोटोज






Kappa











शाळेची आठवण (छायाचित्रे)




हिमगिरी विद्यालय पुणे-३२


हिमगिरी विद्यालय,पुणे-३२
ज्ञानराज
|| वरम् आलानु शासनम् ||
व्यासपीठ



















# कोलंबसाचे गर्वगीत

हजार जिव्हा तुझ्या गर्जु दे, प्रतिध्वनीने त्या समुद्रा, डळमळु दे तारे
विराट वादळ हेलकावु दे पर्वत पाण्याचे ढळु दे दिशाकोन सारे

ताम्रसुरा प्राशुन मातु दे दैत्य नभामधले, दडु द्या पाताळी सविता
आणि तयांची अधिराणी ही दुभंग धरणीला, कराया पाजळु दे पलिता

की स्वर्गातून कोसळलेला, सूड समाधान मिळाया प्रमत्त सैतान
जमवुनि मेळा वेताळांचा या दरियावरती करी हे तांडव थैमान

पदच्युता, तव भीषण नर्तन असेच चालु दे फुटु दे नभ माथ्यावरती
आणि तुटु दे अखंड उल्का वर्षावत अग्नी नाविका ना कुठली भीती

सहकाऱ्यांनो, का ही खंत जन्म खलाशांचा झुंजण्या अखंड संग्राम
नक्षत्रांपरी असीम नीलामध्ये संचरावे, दिशांचे आम्हांला धाम

काय सागरी तारु लोटले परताया मागे, असे का हा आपुला बाणा
त्याहुन घेऊ जळी समाधी सुखे कशासाठी, जपावे पराभूत प्राणा?

कोट्यवधी जगतात जीवाणू, जगती अन् मरती जशी ती गवताची पाती
नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभांखाली निर्मितो नव क्षितिजे पुढती

मार्ग आमुचा रोधू न शकती ना धन ना दारा घराची वा वीतभर कारा
मानवतेचे निशाण मिरवू महासागरात, जिंकुनी खंड खंड सारा

चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती, कथा या खुळ्या सागराला
“अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा किनारा तुला पामराला!”

- **कुसुमाग्रज** (Source-internet)



# हिमगिरीयन्स...

©All the copyrights are reserved with the author. Any misuse of the contents of this material is prohibited. No part of this material may be reproduced or transmitted, in any form or by any means, without prior permission of the author. Do not misuse any part of this published material!